**सत्र खटला क्र. ९३/२०२३**
**शासन विरुध्द किश्कींदाबाई**
**निशाणी क्र. ७६**

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची जबानी</u>.**

**मी याव्दारे शपथेवर सत्य कथन करतो की,**

**माझे नांव** : **सोपान व्यंकटराव कोल्हे**,

**माझे वय** : ४१ वर्षे व्यवसाय – शेती,

**राहण्याचे गांव** : खुंटेगाव, ता. औसा जि. लातूर

**<u>सरतपासणी</u> – श्री. आर. पी. चव्हाण अतिरिक्त सरकारी अभियोक्ता.**

**१.** मी सह्याद्री हॉस्पीटलमध्ये मृतक व्यंकट भगवान पाटील यांना बघायला गेलो होतो. पोलिसांनी मला मरणोत्तर पंचनामा तयार करण्यासाठी नोटीस देवून बोलवले नव्हते. अस झाल नाही की दि. २७/०४/२०२३ रोजी पोलिसांनी माझ्या समक्ष मृतक व्यंकट भगवान पाटील याचा प्रताचा मरणोत्तर पंचनामा तयार केला आणि तो पंचनामा वाचून मी त्यावर सही केली.

**अभियोग पक्षाचे म्हणणे असे आहे की साक्षीदार त्यांना पाठिंबा देत नसल्यामुळे साक्षीदाराला उलटतपास करण्याच्या अनुषंगाने प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात यावी. अभियोग पक्षाचे म्हणणे लक्षात घेता मागितलेली परवानगी देण्यात येत आहे.**

**२.** माझ बरावी वर्गापर्यंत शिक्षण झाल आहे. मला आता मरणोत्तर पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर पंच म्हणून माझी सही आहे. हे म्हणणे खरे आहे की जेव्हा मी त्या पंचनाम्यावर सही केली त्यावेळी पंचनाम्यावर मजकूर लिहिलेला होता. हे म्हणणे खरे आहे की एखाद्या कागदावरचा मजकूर वाचून तो बरोबर असल्यास त्यावर सही केली जाते.

**३.** आरोपी क्र. १ किश्कींदा पाटील यांना मी ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की दि. २७/०४/२०२३ रोजी पोलिसांनी माझया समक्ष सह्याद्री हॉस्पीटलच्या अतिदक्षता विभागात बेड क्र. ५ वर असलेले व्यंकट भगवान पाटील याच्या प्रेताचा मरणोत्तर पंचनामा तयार केला होता. हे म्हणणे खरे आहे की तो पंचनामा वाचून त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की सह्याद्री हॉस्पीटल येथे मी मृतक व्यंकट भगवान पाटीलचे प्रेत बघितले होते. हे मला माहित नाही की मृतक व्यंकट यांच्या डोक्यावर मार असल्यामुळे त्यांच्या डोक्यावर पट्टी बांधली होती. हे म्हणणे खरे नाही की आरोपी माझ्या ओळखीची असल्यामुळे त्यांना वाचविण्यासाठी मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलट तपास आरोपीतर्फे. ॲड. श्री. एस. एस. नळेगावकर</u>**

**४.** हे म्हणणे खरे आहे की मरणोत्तर पंचनाम्यावर पंच म्हणून सही करण्यापूर्वी मी तो पंचनामा वाचला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की त्या दिवशी पोलिसांनी आमच्या ४—५ कागदांवर सह्या घेतल्या होत्या.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Sd/-

**दिनांक : १८.०७.२०२६**

**( आर. बी. भागवत )**
**अतिरिक्त सत्र न्यायाधीश—२**
**लातूर**